# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 17/01/2022 (सोमवार)

(सकाळ)

---

### फसवणुक

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 0.5 कि. मी. अंतरावरील रेल्वे स्टेशन रोड श्रीराम पॅलेस जवळ खाउ गल्ली दुकानासमोर सावनेर येथे दिनांक 16/01/2022 चे 14.30 वा. दरम्यान दोन अज्ञात आरोपी त्यापैकी एक अंगाने सडपातळ, रंगाने सावळा व अंगात काळे जॉकेट, काळे पॅन्ट तोंडाला मास्क दुसरा इसम रंगाने गोरा, अंगात आकाशी रंगाचे शर्ट काळे पॅन्ट यांनी पोलिस इन्स्पेक्टर आहे असे म्हणुन फिर्यादी नामे– सौ. इंदु हिरामण घुगल वय 57 वर्ष रा. वार्ड क्र 03 नाईक ले आउट विठठल रुखमाई मंदीराजवळ सावनेर यांना 'सदर परिसरात चोरी होत आहे, तुम्ही तुमच्या अंगावरील दागिने काढुन पर्स मध्ये ठेवा' असे म्हणुन त्यांचे अंगावरील दागिने काढण्यास भाग पाडुन एका इसमाने त्यांचे हातातील कागदाचा पुडीस बांधुन फिर्यादी यांच्या पर्समध्ये ठेवले. परंतु फिर्यादी यांना शंका आल्याने त्यांनी पर्स मधील दागिण्यांची पुडी सोडुन पाहिली असता त्यामध्ये बेनटेक्सच्या दोन बांगडया दिसुन आल्याने फिर्यादी यांची दिशाभुल करुन तोतयेगिरी व फसवणुक करुन 1) 50 ग्रॅम वजनाच्या सोन्याचा पाटल्या/बांगडया जुन्या वापरत्या किमंत अंदाजे 1,00,000/–रु., 2) 15 ग्रॅम सोन्याचे मंगळसुत्र त्यात मणी व सोन्याचे लॉकेट असलेले जुने वापरते किमंत अंदाजे 30,000/–रु. असा एकुण कि. 1,30,000/– रुपयाचे सोन्याचे दागिने घेवून पसार झाले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 419, 170, 34 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि कारंडे पोस्टे सावनेर मो. नं. 7722011228 हे करीत आहे.

### दुखापत

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 12 कि. मी. अंतरावरील मौजा पटगोवारी येथे दिनांक 15/01/2022 चे 20.00 वा. ते 20.20 वा. दरम्यान फिर्यादी/जखमी नामे– निखील मनोहर बेहुने वय 24 जात लोधी, रा. पटगोवारी हा घरी हजर असतांना आरोपी नामे– राहुल मनोहर बेहुने, वय 27 वर्ष, रा. पटगोवारी, ह. मु. नागपूर त्याचा मोठा भाऊ हा घरी येवुन वडीलांना शेतीचा आणी घराचा हिस्सा पाहीजे असे म्हणुन भांडण करून शिवीगाळ करीत होता. फिर्यादी याने आरोपीस म्हटले की, 'तु घरून चाल्ला जा' यावरून आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ देवुन घराचे आत ठेवलेली झिल्पी झाडाचे काठीने उजव्या हाताला व डोक्यावर मारून जखमी केले. तसेच आरोपीने फिर्यादीला उजवे गालावर चावा घेतला व फिर्यादीचे वडील यांना खाली जमीनीवर पाडुन त्याच काठीने कंबरेवर मारले. फिर्यादीची बहीन वाचविण्यास गेली असता तिच्या हातावर व पाठीवर मारून जखमी केले. फिर्यादीचा काका व काकाची मुलगी मध्यस्थी आले असता त्यांना सुद्धा आरोपीने दगडाने माथ्यावर मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 324, 323, 504 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला सुचनापत्रावर सोडण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक केंद्रे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर